# प्रेसनोट

अँन्टी करप्शन ब्युरो, अकोला
दिनांक २५/०७/२०२४

| | | |
|---|---|---|
| १ | युनिटचे नांव | अँन्टी करप्शन ब्युरो अकोला, घटक |
| २ | आरोपीचे नांव, हुद्दा, वर्ग व कार्यालयाचा पत्ता | श्री. गणेश श्रीराम डुकरे, वय–३४ वर्ष, व्यवसाय–नौकरी, पद–पोलीस अंमलदार, ब.नं. २३०४, नेमणुक–पोलीस स्टेशन खदान जि. अकोला, पत्ता–अंभोडा, पोस्ट–हतेडी ता.जि. बुलढाणा, ह.मु. नविन निमवाडी पोलीस वसाहत बिल्डींग क. ४A, बिल्डींग फ्लॅट नं. ४३ अकोला. |
| ३ | पडताळणी तारीख | दिनांक–१६/०७/२०२४ |
| ४ | मागणी केलेली रक्कम | १,००,०००/– रूपये लाचेची मागणी करून तडजोडी अंति २०,०००/–रूपये स्विकारण्याचे मान्य केले. |
| ५ | स्विकारलेली लाच रक्कम | संशय आल्यावरून लाच स्विकारली नाही. |
| ६ | घटनास्थळ | पोलीस स्टेशन खदान जि. अकोला. |

प्रकरणाची थोडक्यात हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील तक्रारदार यांनी दिनांक १६/०७/२०२४ रोजी अँन्टी करप्शन ब्युरो कार्यालय अकोला येथे तक्रार दिली की, यातील आरोपी पोलीस कर्मचारी श्री. गणेश डुकरे हे तक्रारदार यांच्या भंगारचे दुकानावर आले व तक्रारदारला चोरीची भांडी खरेदी केलेली आहेत असे बोलुन त्यामुळे तुमच्याविरूध्द गुन्हा दाखल करून अटक करावी लागेल. जर गुन्हा दाखल होउ द्यायचा नसेल व अटक करायची नसेल तर एक लाख रूपये द्या असे म्हणुन लाच रकमेची मागणी केली आहे. परंतु तक्रारदार यांना लाच रक्कम देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी पोलीस कर्मचारी श्री. डुकरे यांचे विरूध्द कायदेशिर कार्यवाही होणे करीता अँन्टी करप्शन ब्युरो अकोला येथे तक्रार दिली.

तक्रारदार यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने दि.१६/०७/२०२४ रोजी अँन्टी करप्शन ब्युरोच्या कार्यप्रणाली प्रमाणे दोन शासकिय पंचा समक्ष पडताळणी कार्यवाही करण्यात आली. पडताळणी कार्यवाही दरम्यान पोलीस कर्मचारी श्री. डुकरे यांची पो.स्टे. खदान येथे तक्रारदार सोबत भेट होवुन कामासंबंधाने बोलणी झाली असता श्री. डुकरे यांनी तडजोडीअंती २०,०००/–रूपये (अक्षरी वीस हजार) लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर दिनांक १६/०७/२०२४ रोजी सायंकाळी सापळा कार्यवाही आजमाविली असता, श्री. डुकरे यांना तक्रारदारवर संशय आल्याने पोलीस कर्मचारी डुकरे ते त्यांना परत भेटले नाही व संपर्क सुध्दा केला नाही. यावरुन श्री. डुकरे यांना तक्रारदारवर संशय आल्याने श्री. डुकरे हे लाचेची रक्कम घेण्यास टाळा–टाळ करीत असल्याची व लाच रक्कम स्विकारणार नाहीत याची खात्री झाल्याने तक्रारदार यांच्या तक्रारी वरून पोलीस कर्मचारी श्री. गणेश डुकरे यांच्याविरूध्द पो.स्टे. खदान जि. अकोला येथे आज दिनांक २५/०७/२४ रोजी अप.नं.५७३/२०२४ कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला असुन आलोसे पोलीस कर्मचारी श्री. गणेश डुकरे यांना तात्काळ ताब्यात घेण्यात आले असुन पुढील कार्यवाही सुरू आहे.

सदरची कारवाई पोलीस अधिक्षक श्री. मारूती जगताप, अपर पोलीस अधिक्षक श्री. अनिल पवार लाप्रवि अमरावती यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. नरेंद्र खैरनार, पोलीस अंमलदार डिगांबर जाधव, प्रदिप गावंडे, संदिप ताले, सुनिल येलोने, निलेश शेगोकार व श्रीकृष्ण पळसपगार यांनी केली.

तरी सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते कि, कोणत्याही शासकीय अधिकारी/कर्मचारी अथवा त्यांच्यावतीने कोणत्याही खाजगी इसमाने त्यांचे कोणतही शासकीय काम करून देण्यासाठी लाचेची मागणी केल्यास तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग अकोला येथील खालील क्रमांवर संपर्क साधावा.

मोबाईल क. श्री सचिन सावंत पोलीस निरीक्षक–८८५५८३०८३०
श्री नरेंद्र खैरनार पोलीस निरीक्षक–९१३००१९०७७

ऑफिस फोन नं. ०७२४–२४१५३७०
टोल फ्रि कं. १०६४

(नरेंद्र खैरनार)
पोलीस निरीक्षक
अँन्टी करप्शन ब्युरो, अकोला